# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक समिती तर्फे **अ** दर्जा प्राप्त

पदव्युत्तर कार्यालय : ०२४०- २४०३१२३
बीसीयूडी कार्यालय : ०२४०- २४०३२२३
कुलसचिव कार्यालय : ०२४०- २४०३३३४
फॅक्स बीसीयूडी : ०२४०- ३२२४ / ३३३५
ई-मेल कार्यालय : bcud.office@bamu.ac.in
pgsection@bamu.ac.in
संकेतस्थळ : http://bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद- ४३१ ००४
(महाराष्ट्र)

**संदर्भ क्रं. पी.जी./प्रवेश/२०१५-२०१६/** 2085-2530 **दि:-१२/०१/२०१६**

प्रति,
मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
/प्राचार्य, सर्व संलग्नीत शासकीय व अशासकीय
अनुदानित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये विद्यापीठाच्या विविध विभागात तसेच संगल्नीत सर्व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या ५० पैसेपेक्षा कमी आनेवारी असलेल्या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे पुर्ण परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.**

**संदर्भ:- (१) महाराष्ट्र शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, एफईडी १५९२/१२०२/११३२/ताशि-५ दि. १८ ऑक्टोबर १९९३.**
**(२) महाराष्ट्र शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण, शुल्क-५२१४/प्र.क्र.३६४/१५/मयिर-२ दि. ७ डिसेंबर २०१५.**
**(३) महाराष्ट्र शासन निर्णय, महसुल व वन विभाग एससीवा-२०१५/प्र.क्र ३११/म-७, दि. २० ऑक्टोबर २०१५.**
**(४) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५-१६/१२४२५/दि. ०१-१२-२०१५ चे पत्र.**
**(५) मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे दि. २९-१२-२०१५ रोजी पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०१५/९३०६.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुषंगाने महाराष्ट्र शासन निर्णय ७ डिसेंबर २०१५ नुसार आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाने १५७४७ गावामध्ये दुष्काळ जाहीर केला असून या **दुष्काळग्रस्त भागातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील (इ.बी.सी. धारक) विद्यार्थ्यांचे शासन निर्णय संदर्भ १ च्या मुद्दा क्र ८** अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ या संपुर्ण वर्षाचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत शासनाने संदर्भ २ नुसार कळविले आहे.

त्याअनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी **संगल्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयात** शिक्षण घेत असलेल्या ५० पैसेपेक्षा कमी आनेवारी असलेल्या भागातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आल्याचे शासनाने कळविले असून दुष्काळग्रस्त भागातील कोणत्याही आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (इ.बी.सी. धारक) विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच

ज्या विद्यार्थ्यांचे मार्च/एप्रिल २०१६ च्या परीक्षेसाठीचे शुल्क आकारले असेल अशा आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (इ.बी.सी धारक) विद्यार्थ्यांचे शुल्क विभागांनी / संलग्नीत संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परत करावे, असे शासनाने निर्णयाद्वारे कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद येथे शिक्षण घेत असलेल्या दुष्काळग्रस्त भागातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील (इ.बी.सी. धारक) विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेल्या तक्त्याप्रमाणे तसेच विद्यार्थ्यांने भरावयाच्या प्रमाणपत्रसह भरुन तक्ता पदव्युत्तर विभागास pgsection@bamu.ac.in या ई-मेलवर पाठवावा तसेच भरलेला तक्ता व विद्यार्थ्यांनी भरलेली प्रमाणपत्रे हार्डकॉपीमध्ये पदव्युत्तर विभागास पाठविण्यात यावीत.

तसेच संबंधित सर्व संगल्नीत महाविद्यालयात शिकत असलेल्या दुष्काळग्रस्त भागातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील (इ.बी.सी. धारक) विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेल्या तक्त्याप्रमाणे तसेच विद्यार्थ्यांने भरावयाच्या प्रमाणपत्रसह भरुन तक्ता शैक्षणिक विभागास acadsection@bamu.ac.in या ई-मेलवर तसेच तक्ता व विद्यार्थ्यांने भरलेले प्रमाणपत्र हार्डकॉपीमध्ये मा. प्राचार्य/विभाग प्रमुख / संचालक यांचे सहीसह विनाविलंब **दिनांक ३० जानेवारी २०१६ पर्यंत पाठविण्यात यावी.** (शासन निर्णय, तक्ता व प्रमाणपत्र नमूना विद्यापीठाचे संकेतस्थळ http://bamu.ac.in वर उपलब्ध आहे.)

**संचालक,**
**महाविद्यालये व विद्यापीठ**
**विकास मंडळ**

याची एक प्रत:-

(१) सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
(२) सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
(३) उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव देऊन सर्व संलग्नीत महाविद्यालयांना सूचित करणेबाबत अग्रेषित.
(४) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद यांना माहितीस्तव देण्यात येऊन संबंधित सर्व विभागातील पात्र विद्यार्थ्यांची यादी व हॉर्डकॉपीत माहिती पदव्युत्तर विभागास पाठविण्यात यावी.
(५) नोडल ऑफीसर, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येऊन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तक्ता प्रकाशित करण्यात यावा.
(६) निर्मल सॉफ्टवेअर, (शैक्षणिक विभाग), यांना या पत्राची एक प्रत सर्व महाविद्यायांना तात्काळ कार्यवाहीस्तव संकेतस्थळावर प्रकाशित करणेबाबत आदेशीत.
(७) मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
(८) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**संचालक,**
**महाविद्यालये व विद्यापीठ**
**विकास मंडळ**

# प्रमाणपत्र

दिनांक / /२०१६

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या विभागाने / महाविद्यालयाने विद्यापीठास पाठविण्यात येणाऱ्या यादीतील विद्यार्थी / विद्यार्थीनी श्री./कु./सौ./श्रीमती/ ------------------------------------------------------- या महाविद्यालयाचा /ची नियमित विद्यार्थी /विद्यार्थीनी असून तो / ती विद्यापीठाच्या मार्च /एप्रिल २०१६ मध्ये होणाऱ्या परीक्षेस बसलेला /बसलेली आहे.

तो / ती महाराष्ट्र शासनाने नुकतेच पारित केलेल्य शासन निर्णय ७ डिसेंबर २०१५ नुसार १५७४७ दुष्काळग्रस्त गावातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (इ.बी.सी. धारक) रहिवासी विद्यार्थी /विद्यार्थीनी असून त्याचा / तिचा पत्ता------------------------------------------, मु. पो.-----------------------, तालुका------------, जिल्हा------------------------ असा आहे.

तो / ती शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ या वर्षासाठी परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्यास पात्र आहे.

करीता विद्यार्थ्यास हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

विभाग प्रमुख / प्राचार्य
सही
(शिक्क्यासह)

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

(महत्वाचे- विद्यार्थ्याने हे प्रमाणपत्र संबंधित विभागात / महाविद्यालयात पुढील कार्यवाहीस्तव संबंधित कर्मचाऱ्यांकडे विनाविलंब सादर करावे. व कर्मचाऱ्यांनी यादी तयार यादी व विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे संकलित करुन संदर्भिय पत्रानुसार विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या सहीने हार्डकॉपी व सॉफ्टकॉपी विद्यापीठाकडे सादर करावी.)